Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.

क्र मबाविआ/एबाविसेयो/का- २ / ९५ / २०१०
आयुक्तालय महिला बाल विकास विभाग
३ चर्च रोड पुणे -४११००१
दिनांक:- २ .९.२०१०

प्रति,
सदस्य सचिव,
तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी
(नागरी) -------------------(सर्व)

विषय :- एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत सन २०१०-११ मध्ये नागरी प्रकल्पातील अंगणवाडयांना पुरक पोषण आहार पुरवठयासाठी बचत गट / महिला मंडळे नियुक्त करणेबाबत.

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र. एबावि-२००४/प्र.क्र२३३/ का-५ दि.२८/१०/०५
२) आयुक्तालयाचे पत्र क्र. ३४३१ दि. २३/९/२००८
३) शासन निर्णय क्र. एबावि-२००८/प्रक्र५९/का-५ दि. २४/८/२००९
४) आयुक्तालयाचे पत्र क्र. ३२०१ दि. ३०/९/२००९
५) मुंबई जिल्हा महिला औद्योगिक सहकारी संस्था फेडरेशन, मर्यादित यांचे पत्र दि. २५/६/२०१०
६)या कार्यालयाचे परीपत्रक क्र.एबाविसेयो/का-२/४३६२/२०१०/ दिनांक १०८.२०१०.

या आयुक्तालयाचे सदंर्भीय परिपत्रक क्र.६ न्वये एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत सन २०१०-११ मध्ये नागरी प्रकल्पातील अंगणवाडयांना पुरक पोषण आहार पुरवठयासाठी बचत गट / महिला मंडळे नियुक्त करणेबाबत सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.त्या सोबतच्या प्रपत्र अ -मधील अटी व शर्ती मध्ये काही अंशी बदल करण्यात येत असून या सोबत जोडलेल्या सुधारीत अटी व शर्ती नुसार यापुढे कार्यवाही करण्यात यावी.

आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य

प्रत-१. मा.सचिव,महिला व बाल विकास विभाग मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२. जिल्हाधीकारी तथा अध्यक्ष जिल्हा स्तरीय सकस आहार समिती सर्व जिल्हे--------------------

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.

**प्रपत्र अ**

**अंगणवाडी केंद्रांना (नागरी) महिला मंडळ/ महिला बचतगट यांचे मार्फत आहार पुरवठा चे काम मंजूर करण्या संदर्भात अटी व शर्ती -**

१. महिला मंडळ म्हणजे महिला संस्था असून सदर संस्थचे सर्व संचालक/विश्वस्त /सदस्य हे महिला असणे आवश्यक असून तिची सा र्वजनिक विश्वस्त कायदा १९५० संस्था नोंदणी अधिनियम महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० किंवा कंपनी अधिनियम यापैकी कोणत्याही अधिनियमाखाली नोंदणी झालेली असावी.नोंदणी प्रमाणपत्र घटना (Bye laws) व सभासद यादी तसेच बचतगटांचे बाबतीत उपनिबंधक सहकारी सोसायटी, महिला आर्थिक विकास महामंडळ यांनी नोंदणी केलेले नोंदणीबाबतचे पत्र / प्रमाणपत्र, बचतगटातील सदस्यांची यादी जोडणे आवश्यक राहील.

२. आहार पुरवठा करीत असलेले बचतगटांचे बँकेत खाते असलेले पासबुक, बचतगटातील सदस्यांची यादी, गटाचे वेळोवेळी होणाऱ्या बैठकीची उपस्थिती व इतिवृत्त नोंद वही इत्यादि कागदपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

३. अर्ज केलेल्या सर्व महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगट यांचा स्वतंत्र किचन असने अवश्यक आहे. तिथे स्वच्छता पाणीपुरवठा, हवेशीर वातावरण, आवश्यक भांडी, गॅस कनेक्शन इ. असणे आवश्यक आहे. अर्ज केलेल्या सर्व महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगट यांचा ज्या ठिकाणी आहार शिजवीला जाणार आहे त्या ठिकाणचा (किचनचा) तपासणी अहवाल संबंधीत बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांमार्फत मागविण्यात येईल. किचनची जागा आरोग्यदृष्टया अयोग्य असल्याचा अहवाल बालविकास प्रकल्प अधिका-याकडून प्राप्त झाल्यास काम मंजूर करण्यात येणार नाही.

४. अर्जदार महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगट स्थानिक असावेत. स्थानिक म्हणजे महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगटाच्या नोंदणीचा पत्ता व किचनचा पत्ता ज्या प्रकल्प क्षेत्रात असेल त्या महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगटासाठी तो प्रकल्प विभाग म्हणजे स्थानिक असेल .

५. अर्जदार महिला मंडळ /महिला संस्था / महिला बचतगट यांचेकडे अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत किमान दोन (२ ) वर्ष पूर्ण कालावधीचा शासकिय योजनेत शिजविलेला आहार पुरवठा करण्याचा अनुभव असणे अवश्यक आहे व त्याबाबत सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.मागील निवडप्रक्रियेनंतर निर्माण झालेल्या नवीन प्रकल्पांबाबत अनुभवाची अट शिथिलक्षम राहील.

६. तसेच काही नागरी प्रकल्प हे दोन ते तीन नगरपालिका क्षेत्रात विभागलेले आहेत त्या प्रकल्पामधील ज्या नगरपालिका क्षेत्रातील पत्यावर महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगटाची नोंदणी, किचनचा पत्ता असेल त्याच नगरपालिका क्षेत्रातील एकूण अंगणवाडया सदर महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगटांना सक्षमतेनुसार समप्रमाणात वाटप करण्यात येईल.

७. प्रकल्पनिहाय महिला मंडळ /महिला संस्था / महिला बचतगटांचे अर्जासोबत सादर केलेल्या मूळ कागदपत्रांची तपासणी संबंधीत प्रकल्प अधिकाऱ्यांकडून करण्यात येवून तसे प्रमाणीत करण्यात येईल.

८. महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगट यांचे मधील कार्यकारी मंडळ/सदस्य या पैकी जी महिला देयक सादर करणे व त्यावर स्वाक्षरी करणे, धनादेश स्विकारणे व त्याची स्वाक्षरीसह पोहोच देणे याबाबत प्राधिकृत असेल याबाबतचा ठराव अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

९. आहार केलेल्या पुरवठा कालावधीत अनियमित पुरवठा करणे, खंडीत पुरवठा करणे बाबत सदर महिला मंडळ/बचतगटास प्रकल्पामार्फत कारणे दाखवा नोटीस, पुरवठा कालावधीत किमान तीनवेळा दिले असल्यास त्या मंडळास/बचतगटास काम देण्यात येणार नाही. याबाबतीत अर्जदाराने अर्जासोबत ज्या शासकीय योजनेत आहार पुरवठा करित होते त्या संबंधीत सक्षम अधिकाऱ्याकडून काम समाधानकारक असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.

१०. जिल्हास्तरीय समितीने प्रकल्पनिहाय पात्र ठरविलेल्या अर्जदार महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगटांना आहार पुरवठयासाठी सक्षमतेनुसार समप्रमाणात अंगणवाडयाचे वाटप करण्यात येईल.

११. अर्जदार महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगट यांना स्वखर्चाने तिन महिने आहार पुरवठा करण्याची क्षमता असावी यांचेकडे अर्ज सादर करतेवेळी किमान २५०००/- रुपये (पंचवीस हजार ) व महानगरपालीका क्षेत्रात रू. ५०,०००/- ( रू. पन्नास हजार) बॅक बॅलेन्स असणे आवश्यक आहे.तसेच मागील सहा महिन्याचे बँक विवरणपत्र जोडणे आवश्यक आहे.या विवरणपत्रामध्ये बॅक बॅलन्सच्या दरमहा सरासरी २० टक्के रक्कम शिल्लक असावी.

१२. अंगणवाडीतील ३ ते ६ वयोगटातील लाभार्थ्यांना गरम ताजा आहार व सकाळचा नाष्टा (५०० उष्मांक व १२ ते १५ ग्रॅम प्रथीने युक्त आहार) प्रती लाभार्थी रू. ३.९२/- प्रमाणे दर राहील.

१३. शासन निर्णय क्रमाक एबावि २००८/प्रक्र५९/का५/ दिनांक २४ ऑगस्ट २००९ मधील परिशिष्ठ दोन मध्ये पाककृती दिलेल्या आहेत. तथापी स्थानिक पातळीवर त्या त्या ठिकाणच्या भौगोलिक परिस्थितीनुसार उपलब्ध असलेले खादय पदार्थ विचारात घेवून त्यात आवश्यक ते फेरबदल करण्याचे अधिकार जिल्हास्तरीय सकस आहार पुरवठा समितीस राहतील.

१४. आहाराच्या नमुन्याची तपासणी वर्षातुन किमान दोन वेळा (सहा महिन्यातून एक वेळ) करण्यात येईल.

१५. शासन निर्णय क्र.२००८/प्रक्र५९/का-५ दिनांक २४.८.२००९ नुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

१६. जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेल्या पाककृती प्रमाणे व शासनाने ठरवून दिलेल्या प्रति लाभार्थी प्रति दिन अनुज्ञेय दराने तसेच सुधारित प्रमाणकानुसार आहार पुरवठा करण्यास तयार असून त्याबाबत आम्ही महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगट बांधील आहोत असे हमीपत्र दयावे लागेल व जिल्हास्तरीय समीतीने ठरवून दिलेल्या पाककृतीमधील सर्व घटक पोषण आहारामध्ये असणे अवश्यक राहील.

१७. महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगट यांची स्वतःची वाहतूक व्यवस्था असणे आवश्यक आहे. व अंगणवाडी केंद्रावर वेळेवर आहार पुरवठा करण्याची जबाबदारी राहील.

१८. अन्नामध्ये कुठल्याही प्रकारची भेसळ आढळूण आल्यास/जिवीतास धोकादायक पदार्थ असल्यास अन्न व औषध भेसळ प्रतिबंधक कायदा अंतर्गत महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगट हे कार्यवाहीस पात्र राहतील.

१९. महिला मंडळ/महिला संस्था/महिला बचतगट यांचे स्वयंपाकगृह आयुक्त व त्यांनी प्राधीकृत केलेले/अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी भेट देवून तपासणी करू शकतील.

२०. नव्याने निवड केलेल्या महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगट यांचा पुरवठा कालावधी पुरवठा आदेश दिल्या पासून १ वर्षाचा राहिल.

२१. ज्या महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगटांना आहारपुरवठयाचे काम दिले जाईल त्यांनीच आहारपुरवठा करावा कोणत्याही परिस्थितीत त्रयस्थ संस्था /व्यक्ती /उपपुरवठादार यांचेद्वारे पुरवठा केल्यास संबंधीत महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगट यांचे पुरवठयाचे काम बंद करण्यात येईल.

२२. आहारपुरवठा स्टेनलेस स्टिलच्या बंद ,स्वच्छ ,झाकण असलेल्या डब्यांमधून करणे बंधनकारक राहील.

२३. सद्यस्थितीत कार्यरत शासकिय अधिकारी /कर्मचारी /मानधनी कर्मचारी हे महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगट यांचे सदस्य नसावेत.

२४ काम मंजूर झालेले महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगट यांना प्रती अंगणवाडी वार्षीक रु.२०००/- (रुपये दोन हजार फक्त ) बँक गॅरंटी देणे आवश्यक राहील. पुरवठयासंबंधी अटी व शर्ती बाबतचा करारनामा रु.१००/-(रुपये शंभर फक्त) च्या स्टँप पेपरवर करुन देणे आवश्यक राहील.

२५. अर्ज दाखल करतानाच सर्व कागदपत्रे महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगट यांनी सादर करावीत .अपुर्ण अर्ज व योग्य कागदपत्रे नसलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

वरीलअटींव्यतिरिक्त निवडप्रक्रियेसंदर्भात स्थानिक प्रकल्प पातळीवर येणा-या अडचणीबाबतचा निर्णय जिल्हा स्तरीय समितीने घ्यावा.